**धुळे जिल्हयातील पांझरा नदीवरील मौजे दातर्ती १, अक्कलपाडा १, ता. साक्री, कुसूंबा, न्याहळोद ता. धुळे व तसेच तापी नदीवरील मौजे लोंढरे, खामखेडा, उप्परपिंड ता. शिरपूर, व मौजे वरपाडे व अक्कडसे ता. शिंदखेडा येथील प्रस्तावित असलेल्या एकूण ०९ (नऊ) वाळू घाटांची जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे दि. १८/११/२०२५ रोजी अनुक्रमे सकाळी ११.०० दुपारी १२.०० वा घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

धुळे जिल्हयातील पांझरा नदीवरील मौजे दातर्ती १, अक्कलपाडा १, ता. साक्री, कुसूंबा, न्याहळोद ता. धुळे व तसेच तापी नदीवरील मौजे लोंढरे, खामखेडा, उप्परपिंड ता. शिरपूर, व मौजे वरपाडे व अक्कडसे ता. शिंदखेडा येथील प्रस्तावित असलेल्या एकूण ०९ (नऊ) वाळू घाटांची जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे दि. १८/११/२०२५ रोजी अनुक्रमे सकाळी ११.०० दुपारी १२.०० वा आयोजित करण्यात आली. त्यानुसार सदरील लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष मा. श्री. संदीप पाटील, उप जिल्हाधिकारी (प्रशासन) धुळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. तसेच सदरहू लोकसुनावणीस मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, यांच्या दि. ३१/१०/२०२५ च्या कार्यालयीन आदेशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा तर्फे सदस्य म्हणून प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली.

श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे यांनी दि. १८/११/२०२५ रोजी धुळे जिल्हयातील पांझरा नदीवरील मौजे दातर्ती १, अक्कलपाडा १, ता. साक्री, कुसूंबा, न्याहळोद ता. धुळे व तसेच तापी नदीवरील मौजे लोंढरे, खामखेडा, उप्परपिंड ता. शिरपूर, तसेच मौजे वरपाडे व अक्कडसे ता. शिंदखेडा येथील प्रस्तावित असलेल्या ०९ (नऊ) वाळू घाटांच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी समितीचे अध्यक्ष मा. श्री. संदीप पाटील, उप जिल्हाधिकारी (प्रशासन) धुळे, लोकसुनावणीचे सदस्य श्री. लिंबाजी भड, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक व उपस्थित नागरिकांचे स्वागत केले.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिनियम, २००६ व सुधारित अधिसुचना दि. ०१/१२/२००९ मधील तरतुदी प्रमाणे वाळू घाटांच्या प्रकल्पास पर्यावरण अनुमती मिळण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे. धुळे जिल्हयातील एकूण नऊ (९) ठिकाणी पांझरा नदीवरील मौजे दातर्ती, अक्कलपाडा, ता. साक्री, कुसूंबा व न्याहळोद ता. धुळे व तसेच तापी नदीवरील मौजे लोंढरे, खामखेडा, उप्परपिंड ता. शिरपूर, व मौजे वरपाडे व अक्कडसे ता. शिंदखेडा, जि. धुळे, या प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २९/०९/२०२५ रोजी प्राप्त झाला. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, धुळे यांच्या मान्यतेने दि. १८/११/२०२५, रोजी जाहीर

लोकसुनावणी घेण्याचे आयोजित करण्यात आले होते. याबाबतची जाहीर सुचना दि. १५/१०/२०२५ रोजी दै. लोकमत या मराठी वृत्तपत्रात व द टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आली.

तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिनियम, २००६ व सुधारीत अधिसुचना दि. ०१/१२/२००९ मधील तरतुदी प्रमाणे सदर प्रकल्पाबाबतच्या पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रति मराठी व इंग्रजी या भाषांमध्ये शासनाच्या जिल्हाधिकारी कार्यालय धुळे, जिल्हा उद्योग केंद्र धुळे, जिल्हा परिषद कार्यालय धुळे, उपविभागीय कार्यालय धुळे व शिरपूर, तहसिल कार्यालय, साक्री, धुळे, शिंदखेडा व शिरपूर जि. धुळे, ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, दातर्ती, अक्कलपाडा, ता. साक्री, कुसूंबा, न्याहळोद ता. जि. धुळे, ग्रामपंचायत कार्यालय, लोंढरे, खामखेडा व उप्परपिंड ता. शिरपूर जि. धुळे तसेच ग्रामपंचायत कार्यालय, वरपाडे व अक्कडसे ता. शिंदखेडा जि. धुळे, उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक, या कार्यालयांमध्ये इच्छुक नागरिकांना अभ्यास करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रस्तावीत वाळू घाटांच्या परिसरातील सामान्य जनतेस सदर वाळू घाटांविषयी माहिती देणे व सदरील वाळू घाटांमुळे होणारा परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, वाळू घाटास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व त्या अनुषंगाने माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे होय. याबाबत परिसरातील नागरिक, सामाजिक सस्थांचे प्रतिनिधी यांनी सदरच्या वाळू घाटांबाबत काही आक्षेप, सुचना, टिका-टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात टपाल किंवा (ईमेलव्दारे) कळवाव्यात हि विनंती करण्यात आली होती. त्यानुसार उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे येथे तापी नदीवरील मौजे लोंढरे ता. शिरपूर येथील वाळू घाटांबाबत एक लेखी स्वरूपात सुचना/हरकत प्राप्त झालेली आहे.

**श्री. प्रणव पाखले (संयोजक)** :- माननीय अध्यक्ष महोदय यांचे पूर्वपरवानगीने प्रकल्प प्रवर्तकास पीपीटीचे सादरीकरण करण्यासाठी विनंती केली.

**प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी** :- यांनी धुळे जिल्हयातील पांझरा नदीवरील मौजे दातर्ती, अक्कलपाडा, ता. साक्री, कुसूंबा व न्याहळोद ता. धुळे व तसेच तापी नदीवरील मौजे लोंढरे, खामखेडा, उप्परपिंड ता. शिरपूर, व मौजे वरपाडे व अक्कडसे ता. शिंदखेडा, जि. धुळे, येथील प्रस्तावित असलेल्या ०९ (नऊ) वाळू घाटांच्या प्रकल्पाचे पीपीटी सादरीकरण केले.

जनसुनावणीचे संयोजक **श्री. प्रणव पाखले,** यांनी उपस्थितांपैकी कोणाला आपले विचार/ टिका टिपणी, आक्षेप असतील तर ते मांडावे असे आव्हान केले.

| अ. क्र. | उपस्थितांचे नाव व उपस्थित केलेले विचार/ टिका टिपणी, आक्षेप इ. | प्रकल्प प्रवर्तकाकडून करण्यात आलेला खुलासा |
|---|---|---|
| १ | **श्री. किशोरसिंग दत्तुसिंग गिरासे (रा. लोंढरे) -:**<br>१. वाळू उपसा नियमावीलचे पालन होत नसल्याचे गावातील शेतकरी यांनी बऱ्याचवेळा तहसिलदार व जिल्हाधिकारी यांना निवेदन दिलेले आहे. परंतू कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेले नाही. तरी वाळू उपसा ठेकेदार यांच्या कडून नियमावीलचे पालन होत नसून नियमावलीचे उल्लघन केल्यास कोणाकडे तक्रार करावी ?<br>२. नियमांची पायमल्ली होत असून सध्यांकाळी ६ वाजेनंतरही वाळू उपसा हा सुरूच असतो. तसेच १० मीटर पेक्षा जास्त वाळूचा उपसा केला जातो.<br>३. गावातील रस्ता हा वाहनाचे वजन ८ टन असे प्रमाण मानुन बनविलेला आहे. परंतू वाळू वाहतूक करणारी वाहने यांचे वजन हे ६० टन असते त्यामुळे रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. तसेच जड वाहनामुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते.<br>४. तसेच आमच्या गावात शैक्षणिक व्यवस्था नाही. गावातील मुलांना दूर पायी जावे लागते. मुलांना शाळेत जाण्याच्या वेळी एक तास व शाळेतून घरी येण्याच्या वेळी १ तास वाळूची वाहतूक ही बंद असली पाहीजे. जेणे करून कुठलाही अपघात हा होणर नाही.<br>५. तसेच आम्ही विकासाच्या विरोधात नसून आमची शासनास विनंती आहे की, सदरहू वाळू उपसा हा नियमांचे पालन करून व्हावा, सद्यस्थितीतील रस्ता दुरूस्त करण्यात यावा आणि वाळू वाहतूकीमुळे रस्ता खराब होणार नाही, | **श्री. गोपाळ पाटील, प्रभारी जिल्हा खनिकर्म अधिकारी, धुळे :-** यांनी सांगितले की,<br>१. नोडल अधिकारी तहसिलदार यांना तक्रार करावी.<br><br>**मा. श्री. संदीप पाटील, अध्यक्ष, जनसुनावणी तथा उप-जिल्हाधिकारी (प्रशासन) धुळे :-** यांनी सांगितले की,<br>१. सदर बाबत तहसिलदार यांना सुचित करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | पर्यावरणाचे नुकसान होणार नाही, व शाळेतील मुले यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. | |
| २. | **श्री. प्रकाश कौतिक वाघ (रा. न्याहळोद) -:**<br>१. धुळे शहराचे सांडपाणी नदी पात्रातून न्याहळोद गावात येते. तसेच न्याहळोद, कुंडाणे, सातरणे, नगाव, बिलाडी, मोहाडी, नाव्हर या गावांना पाणी पुरवठा होत असतो. गावात पुर्नभरणाचे कार्यक्रम हाती घेवून पाणी पातळी वाढली आहे. गावात पाणी फिल्टर होण्यासाठी वाळू/ रेती गरजेची आहे. रेती/वाळू उपसा झाल्यास पाणी पातळी खालावेल व नैसर्गिकरित्या पाणी कसे फिल्टर होणार ?<br>२. गावाजवळील नदीमधील वाळू ही चोरी होत आहे. कोणी वाळू चोरी बददल विचारले तर आडवे आले तर तुम्हाला आडवे करून असे आम्हास धमकवण्यात येते. त्यामुळे आमचा या वाळू उपसाला विरोध आहे. ? | -- |
| ३. | **श्री. केतन राजेंद्र जैन — भंडारी (रा. लोंढरे)**<br>१. गावाला गेल्या ३० ते ३५ वर्षा पासून कुठल्याही प्रकारचा महसूल निधी हा मिळालेला नाही. | **मा. श्री. संदीप पाटील, अध्यक्ष, जनसुनावणी तथा उप-जिल्हाधिकारी (प्रशासन) धुळे :-** यांनी सांगितले की, सदर निधी करीता आपण ग्रामपंचायत मार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. जेणे करून जिल्हा खनिज प्रतिष्ठाण (डी.एम.एफ.) अंतर्गत अंशदान निधी बाबत नियमोचित कार्यवाही करणे सोयीचे होईल. |
| ४. | **श्री. योगेश प्रभाकर पाटील - (रा. उप्परपिंड)**<br>१. गावाला कुठल्याही प्रकारचा निधी हा भेटलेला नाही.<br>२. वाळू घेवून जाणाऱ्या जड वाहनामुळे गावातील रस्त्यांची खुप मोठया प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. | **मा. श्री. संदीप पाटील, अध्यक्ष, जनसुनावणी तथा उप-जिल्हाधिकारी (प्रशासन) धुळे :-** यांनी सांगितले की, सदर निधी करीता आपण ग्रामपंचायत मार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. जेणे करून जिल्हा खनिज प्रतिष्ठाण (डी.एम.एफ.) अंतर्गत अंशदान निधी बाबत नियमोचित कार्यवाही करणे सोयीचे होईल. |

सदर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबत प्राप्त झालेल्या एकूण ०४ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

जनसुनावणीचे संयोजक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये केला जाईल, तदनंतर संयोजक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने उपस्थित नागरिकांचे आभार मानुन जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**श्री. प्रणव पाखले**
संयोजक, जनसुनावणी समिती
तथा उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, धुळे.

**श्री. लिंबाजी भड**
सदस्य, जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, नाशिक

**श्री. संदीप पाटील**
अध्यक्ष, जनसुनावणी समिती
तथा
उप-जिल्हाधिकारी (प्रशासन), धुळे.